# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


**क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१४०/(४१)/आ.४/** **दिनांक : २१.११.२०१७**

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.१९ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४०व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दि.१९ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४०व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

२१/११/१७

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

**प्रत :** खाजगी सचिव, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्रादेशिक विभाग, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

उप मुख्य लेखधिकारी (1 / 2 ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना -      ) म.जी.प्रा. मुंबई / सिडको भवन. नवी मुंबई.

**सोबत इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधित कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयात सादर करावा.**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४० व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४०वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री.बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी दुपारी १.०० वा. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.सदाभाऊ खोत, राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३) मा.श्री.शामलाल गोयल, अपर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य,
४) श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, म.जी.प्रा.तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.
५) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, यांचे प्रतिनिधी श्री.सं.रा.मोरे, उप सचिव.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.
१) श्री.सुधाकर डांगे, संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, मुंबई.
३) श्री.अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.) महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्राच्या १३९ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी सभा दि.१२ सप्टेंबर, २०१७ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३९व्या सभेच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३९ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्याबाबत.

संचालक मंडळाची दि.१२ सप्टेंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या १३९व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १३९ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा केंद्राच्या घसारा निधीमधून उपलबध असणा-या व्याजाच्या रक्कमेमधून कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतन दायित्वाच्या अदायगीबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सध्या असलेली भांडवली कामे व त्यातुन मिळणारे महसुली उत्पन्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी लागणारा महसुली खर्च याचा ताळमेळ घालणे अशक्य झाले आहे. सप्टेंबर २०१७ चे वेतन व भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाच्या दायित्वाची पुर्तता करणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आर्थिक दृष्टया अशक्य झाल्याचे अवगत केले.

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक मजीप्रा २१४/प्र.क्र.३३/(आ)/पापु.२३, दिनांक २३.३.२०१७ च्या निर्णयानुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्ते तसेच सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने स्विकारले आहे. या शासन निर्णयातील विविध तरतुदी अटी व शर्तीची पुर्तता करण्याचे काम शासन स्तरावर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर प्रगतीपथावर आहे. या शासन निर्णयातील विविध अटी पैकी महत्वाची जी अट होती ती महालेखापालांच्या सहमतीने लेखाशिर्ष निर्माण करणे आता या अटींची पुर्तता झाली आहे. परंतु पुरवणी मागणीव्दारे लेखाशिर्षाखाली निधी प्राप्त होई पर्यंत प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन दायित्वाचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांच्या उपलब्ध आर्थिक स्त्रोतातुन अदायगी करण्यात यावी, असे शासन पत्र, पाणी पुरवठा व स्व्च्छता विभाग क्र.मजीप्रा/१११७/प्र.क्र.२२७/पापु.२३, दि.३१.७.२०१७ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास कळविले आहे.

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

शासनाच्या अंदाजपत्रकात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी उपलब्ध करुन द्यावयाच्य निधीची तरतुद हीच एक महत्वाची बाब प्रलंबित आहे.

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्व्च्छता विभाग क्र.मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३(अ) /पापु.२३, दि.२३.३.२०१७ मधील निर्देशांप्रमाणे अंतिम कार्यवाही होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतनाच्या दायित्वाची अदायगी करणेसाठी खालील प्रमाणे पर्याय संचालक मंडळापुढे सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा १९७६ मधील अनु.क्र.(३२) मधील तरतुदी नुसार घसारा निधी नियम शासनाच्या मान्यतेने तयार केले आहेत. घसारा निधी हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना व देखभाल दुरुस्ती साठी शासन अधिसुचना २० जून, १९७७ पासुन उभारण्यात आला असुन सदर निधी राष्ट्रीयकृत बँके मध्ये मुदत ठेवी स्वरुपात गुंतविण्यात आला आहे. माहे दि.३१.७.२०१७ अखेर घसारा निधीच्या मुद्दला पोटी दि.१३.२.२०१७ पर्यंत रु.५९८.१४ कोटी इतकी रक्कम गुंतविण्यात आलेली असून त्यावरील व्याजापोटी दि.१३.२.२०१८ पर्यंत रु.१३६.६० कोटी इतके व्याज प्राप्त होणार आहे. दि.७.९.२०१७ अखेर पर्यंत, दि.३.९.२०१४ व २९.८.२०१५ रोजी अनुक्रमे रु.२४८.१२ कोटी व रु.५५.८५ कोटी अशी गुंतवणुक करण्यात आलेली होती. त्याची परीपक्वता अनुक्रमे दि.२९.८.२०१७ व ३.९.२०१७ अखेर पर्यंत व्याजापाटी रक्कम रु.४.१५ कोटी व रक्कम रु.७६.४१ कोटी अशी एकूण रक्कम रु.८०.५६ कोटी इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. सबब रु.८०.५६ कोटी या रकमेची उपलब्धता चालू वेतन व भत्ते आणि निवृत्ती वेतन या करीता उपयोगात आणण्यास मान्यता असावी, असे प्रस्तावित करण्यात येते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा घसारा निधी १९९० मधील नियम क्र.१५ मध्ये नमुद केल्या प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने घसारा निधी हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना व देखभाल दुरुस्ती या प्रयोजना व्यतिरिक्त इतर बाबींसाठी उपयोगात आणता येईल अशी तरतुद आहे.

सद्यपरिस्थितीत वेतन भत्ते व निवृत्ती वेतन अदा करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे इतर कोणतेही पर्याय उपलब्ध नाही. तसेच कर्मचाऱ्यांना वेतन व निवृत्तीवेतन

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

देणे ही अपरिहार्य बाब आहे. त्याचप्रमाणे वेतनाच्या अनुषंगाने न्यायालयीन प्रकरणे लक्षात घेता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सदर निधी हा एकच पर्याय सद्यस्थितीत उपलब्ध आहे.

शासनाकडून निधी प्राप्त होईपर्यंत खालील बाबींसाठी सदरचा निधी वापरण्यास मान्यता असावी. सदर घसारा निधी व्याजाच्या रकमे मधुन जेवढी रक्कम वापरली गेली आहे ती त्याच लेख्यात भरणा करुन संचालक मंडळाला अवगत करण्यात येईल.

१) वेतन, भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाच्या दायित्वाची रक्कम शासनाकडून प्राप्त होईपर्यंत सप्टेंबर २०१७ पासुन पुढील कालावधीसाठी आवश्यक तेवढी तुट येईल ती रक्कम टप्या टप्याने घसारा निधीव्याजाच्या रक्कमेतुन वापरण्यात येईल .

२) सदरची वापरलेली रक्कम पुन्हा शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर जेवढा निधी माहे डिसेंबर च्या विधान मंडळ अधिवेशना मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या वेतन, भत्ते व निवृत्ती वेतनाचे दायित्व या मधील फरकाची रक्कम मंजूर होऊन अर्थसंकल्पीय तरतुद प्राप्त होऊन प्रत्यक्ष महाराष्ट्र जीवन प्रिधीकरणाच्या खात्यावर शासनाकडून शासन निर्णय निर्गमित होऊन निधी प्राप्त होईपर्यंत मासिक जी तुट वेतन भत्यासाठी व निवृत्ती वेतनासाठी आवश्यक असेल तेवढी रक्कम घसारा निधीच्या व्याजापोटी एकूण रक्कम रु.१३१.७० कोटी उपलब्ध आहे, त्यामधुन वापरण्यास मंजूरी देण्यात यावी.

३) ही बाब यापुढे कोणताही प्रघात /(Precident) पायंडा म्हणुन विचारात घेतली जाणार नाही.

४) सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे घसारा निधीतुन एखादया योजनेसाठी/पाणी पुरवठा केंद्रासाठी improvement Agumentation कामे करुन घेण्याचे प्रस्ताव प्रलंबित नाही. म्हणुन आवश्यक तेवढी रक्कम या निधीतून तात्पुरत्या स्वरुपात वळती करुन घेण्यास (temporary diversion of fund) अडथळा नाही.

५) यापूर्वी अंबरनाथ बदलापूर पाणी पुरवठा योजनेसाठी रु.७.८५१ कोटी एवढा निधी कर्ज उभारण्यासाठी घसारा निधी मधुन वापरण्यात आला आहे.

६) माहे एप्रिल २०१७ पासुन माहे ऑगस्ट २०१७ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उत्पन्न व खर्च यांचा ताळमेळ घेता अंदाजे रु.१३.०० कोटी रुपये इतकी तुट प्रतिमहा येते. तथापी घसारा निधी रक्कमेच्या व्याजापोटी उपलब्ध असणाऱ्या रकमे मधुन वेतन भत्ते व निवृत्ती वेतनासाठी आवश्यक असेल तेवढया प्रमाणात हा निधी वापरण्यास मान्यता असावी.

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला वेतन, भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्वाचा निधी शासनाकडून प्राप्त होई पर्यंत येणारी तुट महाराष्ट्र जीवन प्रिधीकरणाच्या वेतन, भत्ते व निवृत्ती वेतन भागविण्यासाठी उपलब्ध असलेल्या घसारा निधीच्या व्याजामधुन वापरण्यास मान्यता असावी .

सदर घसारा निधी व्याजाच्या रकमे मधुन जेवढी रक्कम वापरली गेली आहे, ती त्याच लेख्यात भरणा करुन संचालक मंडळास अवगत करण्यात येईल. या बाबतची कार्यवाही संचालक (वित्त) यांचेकडून करण्यात येईल.

कार्यक्रम बाब मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :-**

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.मजीप्रा-१२४/प्र.क्र.३३/(आ)/ पा.पु.-२३ दि.२३.३.२०१७ मधील तरतुदी नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्त वेतन राज्य शासनामार्फत अदा करावयाचे आहेत तथापी या शासन निर्णयातील तरतुदींची संपुर्णपणे पुर्तता होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला त्यांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, भत्ते व निवृत्ती वेतनाचे दायित्व पुर्ण करण्यासाठी येणारी तुट जेवढी येईल त्या प्रमाणात (मासिक अंदाजे तुट सद्या उत्पन्नाच्या परिस्थिती लक्षात घेता रु.१३.०० कोटी) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील उपलब्ध असलेल्या घसारा निधीच्या व्याजापोटी उपलब्ध असलेल्या रु.१३१.७० कोटी मधुन तात्पुरत्या कालावधीसाठी वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने घसारा निधीतुन वापरलेला निधी पुन्हा त्याच खात्यात जमा करणे बंधनकारक राहिल. या बाबतची कार्यवाही वित्त शाखेकडून करण्यात येईल.

घसारा निधीतील व्याजाच्या रकमे मधुन वेतन भत्ते व निवृत्ती वेतनासाठी मासिक तुट भरुन काढण्यासाठी निधी वापरण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे.

याबाबत सदरची कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.४ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा वार्षिक लेखा सन २०१५-१६ यास मान्यता मिळणे बाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१५-१६ चा वार्षिक लेखा संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. वार्षिक लेख्याबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०१५-१६ चा वार्षिक लेख्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

१) ठराव करण्यात येत आहे की, सन २०१५-१६ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात येत आहेत.

२) असाही ठराव करण्यात येत आहे की, सन २०१५-१६ या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने अध्यक्ष व सदस्य सचिव यांनी प्रमाणित करावेत.

३) तसेच असाही ठराव करण्यात येत आहे की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्याच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही, अशा किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या संचालक (वित्त) व सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) स्वीकृत लेखा, महालेखापाल मुंबई यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे इ. साठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतवण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणे बाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गुंतवावी याबाबत शासनाने दि.२७.१०.२०१५ अंतर्गत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडूनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

प्राधिकरणाच्या १३८ व्या बैठकीत दि.२०.७.२०१६ ते दि.२.३.२०१७ या कालावधीचे अल्प/ दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. आता दि.३.३.२०१७ ते दि.७.९.२०१७ या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव:-**

असा ठराव करण्यात येतो की, दि.०३.०३.२०१७ ते दि.०७.०९.२०१७ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६** NTPC अर्थसहाय्यीत सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना ७५ MLD (उजनी धरण उद्भव-समांतर पाईप लाईन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून राबविणे बाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सोलापूर शहर व NTPC प्रकल्पग्रस्त गावांकरिता (फताटेवाडी, आहेरवाडी व होटगी स्टेशन) NTPC च्या अर्थसहाय्याने वाढीव पाणी पुरवठा योजना (७५ द.ल.लि.) राबविणेसाठी NTPC व सोलापूर महानगरपालिका यांच्यामध्ये सामंजस्य करार (MoU) झालेला आहे. या योजनेसाठी NTPC मार्फत सोलापूर महानगरपालिकेस रु.२५० कोटी इतके अर्थसहाय्य प्राप्त होणार आहे. सदर पाणी पुरवठा योजना सोलापूर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणार असून, योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तयार करणेत आलेला आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.२९२, दि.२१.१२.२०१६ अन्वये सदर कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर काम मजीप्रामार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून पाहणेबाबत आयुक्त, सोलापूर यांनी दि.९.१२.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर प्रकल्पाची व्याप्ती व संभाव्य अडचणी

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

लक्षात घेता, प्रकल्प राबविण्याचा कालावधी लांबण्याची शक्यता आहे. तसेच सोलापूर महानगरपालिकेसमवेत संयुक्त मोजमापे घेणे व त्याची नोंद मोजमाप पुस्तकात घेणे ही कामे सुध्दा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास करावी लागणार आहेत. त्यामुळे शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दि.२२.२.२०११ नुसार ३% प्रकल्प व्यवस्थापन शुल्क पुरेसे नाहीत.

विभागीय आयुक्त, पुणे, आयुक्त सोलापूर महानगरपालिका, जिल्हाधिकारी, एन.टी.पी.सी.चे अधिकारी व पदाधिकारी यांच्या समवेत घेण्यात आलेल्या बैठकीत मजीप्रास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून ३% प्रमाणे शुल्क अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला व निविदेबाबतची कार्यवाही सोलापूर महानगरपालिकेच्या विहित नियमानुसार करण्याचे ठरविण्यात आले. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येत असलेली अतिरिक्त २% (एकूण ५%) रकमेची मागणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाने तसा निर्णय घेतल्यास देण्याचे मान्य करण्यात आले असल्याचे आयुक्त सोलापूर महानगरपालिका यांनी त्यांचे पत्र क्र. ४०२, दि.९.१२.२०१६ अन्वये कळविलेले आहे. त्या अनुषंगाने कार्यक्रम बाब संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

NTPC अर्थ सहाय्यीत सोलापूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना (उजनी उद्‌भव समांतर पाईपलाईन) या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्या करिता ५% शुल्क आकारण्यासाठी संचालक मंडळ मान्यता देत आहे. या अनुषंगाने सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची : कार्यक्रम बाब क्र.१** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गट-क संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत सदस्य सचिव यानी संचालक मंडळास अवगत केले. यावर अपर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सध्या सुरु असलेली कामे, त्यासाठी उपलब्ध असलेले कर्मचारी/ अधिका-यांची

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

सध्या सुरु असलेली कामे, त्यासाठी उपलब्ध असलेले कर्मचारी/ अधिका-यांची आवश्यकता याचा सविस्तर आढावा घेऊन गट "क" मध्ये जेवढी पदे करार पध्दतीने घ्यावयाची आहेत, तेवढ्याच पदांचा प्रस्ताव योग्य समर्थनासह पुढील बैठकीमध्ये सादर करण्याच्या सुचना दिल्या. या सुचनांच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवावा.

| | |
|---|---|
| **आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२** : | तिलारी प्रकल्पावर आधारित पाणी पुरवठा योजना जि.सिंधुदूर्ग. मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लि. (SUSPL) यांची पाणी मागणी वगळून योजना राबविणेबाबत, तसेच मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लि. (SUSPL) व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेदरम्यान केलेला सामंजस्य करार (Memorandum of Understanding) रद्द करणेबाबत. |

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२९ सप्टेंबर २०१० रोजीच्या ११८ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत पारित ठरावानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लि. (SUSPL) यांचेमध्ये दि.२५ एप्रिल २०११ रोजी मा.उच्चाधिकार समितीच्या सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली सामंजस्य करार करण्यात आला.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पारित ठरावाच्या अनुषंगाने शासनाने सदर योजनेस दि.१ जुन २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केली. सदर प्रशासकीय मान्यतेतील मंजुर वित्तीय आकृतीबंधानुसार मे. श्री उत्तम स्टील्स व पॉवर लि. यांच्या सहभागाची रक्कम रु. १४११९.०८लक्ष्य इतकी आहे.

सद्य:स्थितीत योजनेवर माहे ऑगस्ट २०१७ अखेर रु.५२.९७ कोटी ढोबळ इतका खर्च झालेला असून, प्रलंबित देयके अदा केल्यानंतर अद्याप रु.११.६३ कोटी ढोबळ खर्च होईल. सदर प्रलंबित देयकाचा खर्च गृहित धरता योजनेवर एकूण रु.६४.६१ कोटी इतका खर्च सद्य:स्थितीत झालेला आहे.

योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार झालेल्या कामापोटी व खर्चाच्या प्रमाणात मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांचेकडून रु.४२.०० कोटी (रु.६४.६१ कोटीच्या ६५%) एवढा निधी प्राप्त होणे अपेक्षित होते. मात्र, मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

लिमिटेड (SUSPL) यांचेकडून ऑगस्ट २०१३ मध्ये रु.१०.०० कोटी व जानेवारी २०१५ मध्ये रु.१०.०० कोटी असे एकूण रु.२०.०० कोटी इतकाच निधी प्राप्त झाला आहे. मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लि. यांचेकडून निधी प्राप्त करुन घेण्यासाठी वारंवार पत्रव्यवहार, बैठका तसेच विविध स्तरावरुन चर्चा करुनही त्यांचा हिस्सा अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. निधीअभावी कंत्राटदाराची देयके थकल्याने, कंत्राटदाराने योजनेची कामे बंद ठेवली आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांच्यामध्ये दि.२५ एप्रिल २०११ रोजी झालेल्या सामंजस्य करारातील (MoU) अट क्र.११ नुसार, "योजनेची कामे सुरु झाल्यावर मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांनी योजनेतून माघार घेतल्यास योजनेच्या इतर लाभार्थ्यांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजना पूर्ण करेल" अशी तरतूद आहे. प्रत्यक्षात योजनेतून माघार घेत असल्याबाबत मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांनी अद्याप कळविले नसले तरी फेब्रुवारी २०१५ पासून आजतागायत योजनेची कामे सुरु ठेवण्याच्या दृष्टीने वारंवार बैठका घेऊन व पाठपुरवा करुनही आवश्यक निधीचा पुरवठा केलेला नाही. ही एक प्रकारे त्यांनी योजनेतून माघार घेतली असल्याचे व योजनेत स्वारस्य नसल्याबाबतचा निष्कर्ष निघत आहे.

प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-I कार्यालयाने सन २०१६-१७ च्या लेखा परिक्षा प्रतिवेदन (सामान्य व सामाजिक क्षेत्र) - महाराष्ट्र शासनामध्ये ठेवण्याकरीता परिच्छेदाचा मसूदा त्यांच्या दि.१२ मे २०१७ च्या पत्रान्वये पाठविला आहे. त्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांच्यातील सामंजस्य करारातील अट क्र.११ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पर्यायी व्यवस्थेद्वारे योजना पूर्ण करण्यासाठी व्यवस्था न केल्याने मूळ लाभार्थी वंचीत राहण्याबरोबरच रु.५२.९५ कोटीचा निधी अडकविल्याबाबत (Blocking of Funds) तसेच कंत्राटदाराच्या रु.११.६६ कोटी इतक्या थकीत देयकाचे दायित्व निर्माण केल्याबाबत गंभीर आक्षेप घेतले आहेत.

मा. मंत्री, वित्त व नियोजन यांनी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पिय भाषणात सदर योजनेसाठी शासन रु.१००.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देईल अशी घोषणा केली आहे. त्यानुसार स्वतंत्र लेखाशीर्ष देखील निर्माण करण्यात आले असून, सन २०१७-१८ च्या पुरवणी मागणीद्वारे रु.२०.०० कोटीची तरतूद विधानमंडळाच्या सन २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात मंजुर करुन करुन घेण्यात आली आहे.

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव:-**

१. मे.श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड(SUSPL) व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेदरम्यान दि.२५ एप्रिल २०१५ रोजी करण्यात आलेला सामंजस्य करारनाम्यातील (MoU) अट क्र.११ नुसार SUSPL हे योजनेच्या पुढील कामाकरिता लागणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देत नसल्याने सदर सामंजस्य करारनामा संपुष्टात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यादृष्टीने पुढील कार्यवाही करण्यास मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. मे.श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेदरम्यान दि.२५ एप्रिल २०१५ रोजी करण्यात आलेल्या सामंजस्य करारनाम्यानुसार (MoU) सामायिक कामासाठी झालेल्या खर्चापोटी मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांचेकडून पाणी वापर प्रमाणात रक्कम वसूल करावयाची आहे. यानुषंगाने मे. श्री उत्तम स्टील ॲन्ड पॉवर लिमिटेड (SUSPL) यांचा या योजनेमधील सहभाग हा शासनाच्या निर्देशानुसार करण्यात आला असल्याने, सदरची वसूली शासन स्तरावरुन करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. सदर करारनामा रद्द करण्यात येत असलेबाबत अपर मुख्य सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात यावे.

**अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**